


ॲग्रोव्हिजनची माहिती देताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी. शेजारी खासदार कृपाल तुमाने, सी. डी. मायी आदी मान्यवर.

# नोव्हेंबरमध्ये ॲग्रोव्हिजन प्रदर्शन

म.टा. विशेष प्रतिनिधी, नागपूर

ॲग्रोव्हिजन फाऊंडेशन, एम.एम. ॲक्टिव्ह सायन्स टेक कम्युनिकेशन, पूर्ती उद्योग समूह, विदर्भ आर्थिक विकास परिषद (वेद) आणि महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेच्यावतीने आयोजित 'ॲग्रोव्हिजन' कृषी प्रदर्शन येत्या २३ ते २६ नोव्हेंबर दरम्यान रेशीमबाग मैदानात होणार असल्याची माहिती 'ॲग्रोव्हिजन'चे प्रवर्तक व केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी एका पत्रकार परिषदेत दिली.

तत्पूर्वी गडकरी यांनी नागपूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व विविध क्षेत्रातील मान्यवरांची बैठक घेऊन प्रदर्शनाबाबत चर्चा केली. यावेळी रामटेकचे खासदार कृपाल तुमाने, आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, जिल्हा परिषद अध्यक्ष निशा सावरकर, ॲग्रोव्हिजन सल्लागार समितीचे अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, आयोजन समितीचे सचिव रवी बोरटकर, रमेश मानकर, माजी आमदार

## शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे बळ

अशोक मानकर, खुशाल बोपचे, आशिष जयस्वाल, भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजीव पोतदार प्रामुख्याने उपस्थित होते. ॲग्रोव्हिजनमध्ये विविध कार्यशाळा, कृषी संबंधित उत्पादनांचे प्रदर्शन, परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहे. पशू प्रदर्शनदेखील भरवण्यात येईल. ॲग्रोव्हिजन कृषीमंथन (ॲग्रीथॉन) या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, भित्तीपत्रक सादरीकरण व नाविन्यपूर्ण प्रकल्प, स्टार्ट अप्स प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. ॲग्रोव्हिजन दशकपूर्तीच्या निमित्ताने गेल्या दहा वर्षात विदर्भात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या यशस्वी शेतकऱ्यांचा 'ॲग्रोव्हिजन पुरस्कार-२०१८'ने गौरव करण्यात येईल. या पुरस्कारांच्या श्रेणीत फलोत्पादन, कृषीपूरक व्यवसाय, यशस्वी कोरडवाहू शेती, दुग्धोत्पादन, जलसंधारण आदींचा समावेश राहील.

कापूस उत्पादन, जवस उत्पादन, जैविक शेती, शेळी मेंढी पालन व निर्यात संधी, रेशीम उत्पादन, मधुमक्षिका पालन, सुक्ष्म सिंचन, हरितगृह तंत्रज्ञान, कृषी वित्त पुरवठा, निसर्ग शेती, भाजीपाला उत्पादन, डिजिटल पेंमेट जागृती या विषयावर प्रदर्शनात कार्यशाळा होतील. संबंधित क्षेत्रातील यशस्वी शेतकरी व कृषी शास्त्रज्ञ यांच्या माध्यमातून माहिती देण्यात येईल. फुलशेती, हळद-आले लागवड, संत्री प्रक्रिया, सेंद्रीय शेती, मत्स्यपालन, कुक्कुट पालन यावर कार्यशाळा होणार आहेत. याखेरीज दुग्ध व्यवसाय, बांबू लागवड-व्यापार संधी, उस उत्पादन यावर एक दिवसीय परिषदांचेही आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती नितीन गडकरी यांनी दिली.

➤ पंतप्रधानांना निमंत्रण... नागपूर प्लस...